# गोष्टी ईश्वराच्या

## लेखक : विष्णू नागर



ईश्वर एके दिवशी रस्त्यावरून चालले होते; इतक्यात एक लहान मुलगा त्यांच्याजवळ आला आणि म्हणाला, "काका, तुम्ही ईश्वर आहात का?"

चकित होऊन ईश्वर म्हणाले, "हो रे बाळा, मी ईश्वर आहे. काय म्हणतोस? पण एक सांग, ओळखलस कसं तू मला? मी तर गेले वर्षभर इथेच आहे. पण आजपर्यंत कोणीच नाही ओळखलं मला."

मुलगा म्हणाला, "मी तसं सहजच विचारलं होतं. पण मला इतकं माहीत आहे, की ईश्वराने माझ्यावर अन्याय केला आहे. त्याने माझे आई-वडील, दोघांनाही हिरावून नेलं आहे. ईश्वराने असं कां केलं, ते मला जाणून घ्यायचंय."

"याला काहीच कारण नाहीये रे बाळा. चल, मी तुला एक छानसा चेंडू देतो."

“मुळीच नको मला चेंडू-बिंडू. मला सांगा, की असं का केलंत तुम्ही माझ्याबरोबर?”

“बरं. सोन्याच्या मोहरा घे या दोन. यामुळे आयुष्य सोपं होईल तुझं.”

“काहीही नकोय मला. मला फक्त माझे आई-बाबाच हवेत.”

“ मरण पावलेले लोक परत येत नसतात बाळा. जगाचा नियम आहे हा.”

“जर ते परत येऊ शकत नसतील, तर तुम्ही त्यांना माझ्यापासून हिरावूनच का घेतलत? सांगा?”

मुलगा रागात होता आणि आपल्या इवल्या इवल्या हातांनी ईश्वराला मारत होता,



चावत होता. त्यांचे कपडे ओढत होता. त्यांना लाथा मारत होता.

काही लोक लांबून हे दृश्य पाहत होते. मामला जास्तच बिघडलेला वाटला, तेव्हा ते जवळ आले. त्यांनी मुलाला सोडवायचा प्रयत्न केला, तर तो जोरजोरात ओरडला, “हा ईश्वर आहे. याने माझे आई-बाबा हिरावून नेले. आता म्हणतोय, ‘परत नाही देणार’. याला सोडणार नाही, मारणार मी. सोडा मला.”

शेवटी आपला जीव वाचवण्यासाठी ईश्वराला म्हणावे लागले, “हा मुलगा मला ईश्वर समजतो आहे. याला समजवा तुम्ही.”

“जा तुम्ही भाऊसाहेब. आरामात निघून जा. आईवडील गेल्यानंतर या मुलाने पहिल्यांदाच अशी खोडी काढली आहे. आम्ही समजावतो त्याला.”

या घटनेनंतर ईश्वर मुलांना घाबरतात. ते सगळ्यांना दिसतात पण मुलांना नाही.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १६२ मधून साभार.*

*§§§*

---

लेखक : **विष्णू नागर,** पत्रकार, नवभारत टाईम्स, दैनिक हिंदुस्तान, कादंबिनी, नई दुनिया आणि शुक्रवार समाचार साप्ताहिक यांच्याबरोबर काम केले आहे. भारतीय प्रेस परिषदेचे माजी सदस्य आणि वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयाच्या कार्यकारिणीचे माजी सदस्य. सध्या स्वतंत्र लेखन करतात.

अनुवाद : **संजीवनी आफळे,** शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

इ-मेल : saaphale@rediffmail.com

*ही कथा हरियाणा राज्य संसाधन केंद्राने तयार केलेल्या विष्णू नागर यांच्या 'ईश्वर की कहानिया' या पुस्तकातून साभार.*

***(कळीचे शब्द : कथा, story)***